महाराष्ट्र शासन

क्रमांक : गौखनि ५०/१११८/प्र.क्र.४१७/ख

महसूल व वन विभाग
मादाम कामा मार्ग,
हुतात्मा राजगुरू चौक,
मंत्रालय, मुंबई - ३२
दिनांक : ०४ सप्टेंबर, २०१९

विषय : गौण खनिज-भंडारा
सन २०१७-१८ या वर्षाकरिता मौजे लोभी (दिग्धाघाट), ता. तुमसर या वाळूगटाची शासनजमा केलेली रक्कम परत करणेबाबत.
- श्री. अनिरूध्द हरीहर मंडल.

शासन ज्ञापन:

जिल्हाधिकारी, भंडारा यांना त्यांचे पत्र क्रमांक आसन-१४/कलि/खनिज/कावि/७०२/२०१८, दि.२०/१०/२०१८ रोजीच्या उपरोक्त विषयाबाबतच्या पत्रांस अनुलक्षून असे कळविण्याचे मला निदेश आहेत की, सन २०१७-१८ मधील मौजे लोभी (दिग्धाघाट), ता. तुमसर हा वाळूगट सर्वोच्च बोली रु.२१,५९,१४२/- एवढया रकमेस श्री. अनिरूध्द हरीहर मंडल यांना मंजूर करण्यात आला. लिलावधारक यांनी उक्त वाळूगटाची ३/४ रक्कम विहित कालावधीत शासनजमा न केल्याने जिल्हाधिकारी भंडारा यांनी दि.७.१२.२०१७ च्या आदेशान्वये लिलावाची १/४ रक्कम शासनजमा करून सदर वाळूगट रद्द केला.

तद्नंतर जिल्हाधिकारी, भंडारा यांनी दि.९.०१.२०१८ रोजीच्या पत्रान्वये विभागीय आयुक्त, नागपूर यांना उर्वरीत रक्कम भरून घेण्यास विशेष बाब म्हणून मान्यता देण्याची विनंती केली. त्याअनुषंगाने विभागीय आयुक्त, नागपूर यांनी दि. ११.०१.२०१८ रोजी सादर केलेल्या प्रस्तावाच्या अनुषंगाने शासनाने दि.१७.२.२०१८ च्या पत्रान्वये मौजे लोभी (दिग्धाघाट), ता. तुमसर या वाळूगटाची ३/४ रक्कम भरण्यास "एक विशेष बाब" म्हणून मान्यता देण्यात आली. त्याअनुषंगाने लिलावधारक यांनी उर्वरित ३/४ रक्कम शासनजमा केली.

तथापि, मे. किंझा ट्रेडर्स यांनी मा. उच्च न्यायालय खंडपीठ नागपूर येथे याबाबत रिट याचिका क्र.१४८७/२०१८ दाखल केली. मा. उच्च न्यायालय खंडपीठ नागपूर यांनी दि.०३/०५/२०१८ च्या आदेशान्वये सदर प्रक्रिया नियमानुसार योग्य नसल्याने सदर रेतीघाटाची प्रक्रिया रद्द करण्याचे आदेश निर्गमित करण्यात आले. मा. उच्च न्यायालय, खंडपीठ नागपूर यांचे आदेशावरून मौजे लोभी (दिग्धाघाट), ता. तुमसर या वाळूगटाच्या लिलावधारकासोबत करारनामा करण्यात आला नाही. त्यामुळे संबंधित लिलावधारकांनी सदर रेतीघाटामधून रेतीची उचल केली नाही. लिलावधारक श्री. अनिरूध्द हरीहर मंडल यांनी सदर वाळूगटाची प्रक्रिया रद्द झाल्याने मा. उच्च न्यायालय खंडपीठ नागपूर येथे जनहित याचिका क्र.६५/२०१८ मध्ये सिव्हील ॲप्लीकेशन क्र.१८२५/२०१८ अन्वये शासनजमा केलेली रक्कम परत मिळण्याची विनंती केली. मा. उच्च न्यायालय खंडपीठ नागपूर यांनी दि.१०/१०/२०१८ रोजी "We clarify that pendency of public interest litigation does not stop respondent-State from considering the applications for refund of proportionate amount as per law. With this clarification, we dispose of civil application." असे आदेश पारीत केले. मा. न्यायालयाच्या उक्त आदेशाच्या अनुषंगाने लिलावधारकाने लिलावाची ३/४ रक्कम वेळेत न भरल्यामुळे लिलावाची १/४ रक्कम रू.५,३९,७८६/- जप्त करून लिलावाची उर्वरीत रक्कम रू.१६,१९,३५६/- लिलावधारकास परत करण्याबाबचा शासनाने निर्णय घेतला आहे.

२. सबब, श्री. अनिरूध्द हरिहर मंडल यांना एकूण रक्कम रु.१६,१९,३५६ /- (रुपये सोळा लाख एकोणीस हजार तीनशे छप्पन फक्त) इतकी शासनजमा केलेली रक्कम मा. उच्च न्यायालयाच्या आदेशानुसार त्यांनी लिलावाची संपूर्ण रक्कम प्रत्यक्षात शासनाकडे जमा केल्याची, यापूर्वी ही रक्कम अदा

केलेली नाही याची खातरजमा करुन घेण्याच्या अटीवर अदा करण्यास या शासन ज्ञापनाद्वारे शासनाची मान्यता देण्यात येत आहे.

३. याबाबीवर होणारा खर्च सन २०१९-२० यावर्षाकरीता लेखाशिर्ष "०८५३ - अलोहयुक्त खाणी व धातुशास्त्रीय उद्योग "१०२ - खनिजबाबत सवलत फी व स्वामित्वधन, ९००, अलोहयुक्त खाणकाम व धातुशास्त्रीय उद्योग - वजा परतावे (००) (०१) वजा परतावे (०८५३ ००८६) खाली वजा परतावे देण्याकरीता करण्यात आलेल्या उपलब्ध अंदापत्रकीय तरतूदीमधून खर्ची टाकून भागविण्यात यावा.

४. सदर शासन ज्ञापन वित्त विभागाच्या क्र.विअप्र-२०१९/प्र.क्र.२०/२०१९/विनियम, दि.८/०८/२०१९ रोजीच्या शासन निर्णयान्वये वित्तीय अधिकार नियम पुस्तिका,१९७८, भाग-२ नुसार महसूल व वन विभागास प्रदान करण्यात आलेल्या वित्तीय अधिकारानुसार निर्गमित करण्यात येत आहे.

सदर शासन ज्ञापन महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आले असून त्याचा संकेतांक २०१९०९०५११५७३३३८१९ असा आहे. हे शासन ज्ञापन डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करून काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

Dinesh Rohidas Chavan

Digitally signed by Dinesh Rohidas Chavan
DN: c=IN, o=Government of Maharashtra, ou=Revenue and Forest Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=c0edee7a8805e86e41846cf28cf151b9ce48bb88ebf4f2e8a7fc10e8dcad98ec, serialNumber=8c2377ed235498603821d49922a210871ff6fb9b369722ac707aee7dcd87f2bd, cn=Dinesh Rohidas Chavan
Date: 2019.09.05 12:03:04 +05'30'

(दिनेश चव्हाण)
अवर सचिव
महसूल व वन विभाग

प्रति,

जिल्हाधिकारी भंडारा, भंडारा.

प्रत:

१) विभागीय आयुक्त, नागपूर विभाग, नागपूर.
२) प्रधान महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता)-२, नागपूर.
३) प्रधान महालेखापाल (लेखापरीक्षा)-२, नागपूर.
४) जिल्हा कोषागार भंडारा, भंडारा.
५) वित्त विभाग, (व्यय-९,अर्थसंकल्प -३, ६ व १४ कार्यासने) हुतात्मा राजगुरु चौक, मादाम कामा मार्ग, मंत्रालय, मुंबई -३२.
६) कार्यासन अधिकारी (ब-१ कार्यासन) महसूल व वन विभाग, हुतात्मा राजगुरु चौक, मादाम कामा मार्ग, मंत्रालय, मुंबई -३२.
७) निवडनस्ती ख कार्यासन, महसूल व वन विभाग, हुतात्मा राजगुरु चौक, मादाम कामा मार्ग, मंत्रालय, मुंबई -३२.